RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ५५] गुरुवार, एप्रिल ३०, २०२६/वैशाख १०, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १८१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ एप्रिल, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.

क्रमांक न्यायस्था-२०२५/प्र.क्र.४५/का-१२.- महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) याच्या कलम २१, २२अ व २३ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या औरंगाबाद जिल्हा न्यायालयास दुय्यम असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद यांच्या न्यायालयांशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे असे निर्देश देत आहे की, दिनांक ४ मे २०२६ पासून,—

(क) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे जिल्हा न्यायालय, औरंगाबाद यास दुय्यम असलेले एक दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर असेल;

(ख) दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर हे उक्त न्यायालयाचे पीठासीन अधिकारी असतील आणि ते छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे त्यांचे न्यायालय भरवतील; आणि

(ग) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पैठण यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण या महसुली तालुक्यात समाविष्ट असलेल्या गावांचा समावेश असेल, जे यापूर्वी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, औरंगाबाद यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमेमध्ये समाविष्ट होते, ते त्यामधून वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विलास व. गायकवाड,
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 29th April, 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. Nyaystha 2025/CR 45/Desk XII.— In exercise of the powers conferred by section 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869), and of all powers enabling it in this behalf, and in partial modification of all the earlier notification issued in this behalf, in so far as they relate to the Court of the Civil Judge (Senior Division) Aurangabad, subordinate to the District Court, Aurangabad, the Government of Maharashtra, hereby directs that with effect from the 04th May 2026,—

(*a*) there shall be a Court of Civil Judge at Paithan at Chhatrapati Sambhajinagar, subordinate to the District Court, Aurangabad.

(*b*) the said Court shall be presided over by the Civil Judge (Senior Division), who shall hold his Court at Paithan ; and

(*c*) the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge (Senior Division), Paithan in Chhatrapati Sambhajinagar District shall comprise the areas covered within the local limits of the Revenue Taluka of Paithan in Chhatrapati Sambhajinagar District and work from the said Taluka which was heretofore included within the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge (Senior Division), Aurangabad in Chhatrapati Sambhajinagar District shall be excluded therefrom.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS V. GAIKWAD,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.

विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ एप्रिल, २०२६.

अधिसूचना

हिंदू विवाह कायदा,१९५५.

क्रमांक न्यायस्था-२०२५/प्र.क्र.४५/का.१२.— हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत, यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण या महसुली तालुक्याशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे दिनांक ४ मे, २०२६ पासून महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) या अन्वये स्थापन केलेल्या व अस्तित्वात असलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पैठण यांच्या न्यायालयाच्या सर्वसाधारण व विशेष अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये, उक्त अधिनियमान्वये निर्णय करावयाच्या प्रकरणांच्या बाबतीत, अधिकारिता असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पैठण यांचे न्यायालय विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विलास व. गायकवाड,
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 29th April, 2026.

NOTIFICATION

HINDU MARRIAGE ACT, 1955.

No. Nyaystha 2025/CR 45/Desk XII.— In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 3 of the Hindu Marriage Act, 1955 (25 of 1955), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in that behalf, and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the Revenue Taluka of Paithan in Chhatrapati Sambhajinagar District, the Government of Maharashtra hereby, with effect from 04th May 2026, specifies, the Court of Civil Judge (Senior Division) Paithan in Chhatrapati Sambhajinagar District as having jurisdiction in respect of the matters to be dealt with under the said Act within the local limits of ordinary and special jurisdiction of the existing Court of Civil Judge (Junior Division) Paithan in Chhatrapati Sambhajinagar District, established under the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS V. GAIKWAD,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.